# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/01/2024 (शुक्रवार) दुपार


### उत्तर प्रदेश येथील घर सोडून निघालेल्या मतिमंद मुलाला जलालखेडा पोलिसांनी केले त्याच्या नातेवाईकांच्या ताब्यात

दिनांक ०३/०१/२०२४ रोजी ग्राम परसोडी (दीक्षित) येथे गावामध्ये अनोळखी मतिमंद मुलगा फिरताना आढळून आल्याने ग्राम परसोडी (दीक्षित) येथील पोलीस पाटील टेकाडे यांनी त्याला विचारपूस केली असता तो कोणताही पत्ता व काही माहिती सांगत नसल्याने पोलीस पाटील व गावातील काही इसम यांनी त्यास पोलीस स्टेशन जलालखेडा येथे आणून हजर केले. सदर अनोळखी मतिमंद मुलगा याला पोलीस स्टेशन येथे ठाणेदार सी. बी. चौहान व स्टाफ यांनी अत्यंत कसोशीने व बारकाईने विचारपूस केली असता त्याने आपले नाव मयंक असे सांगितले व तो ग्राम हतेरी ता. जालौन जि. जालौन (उत्तर प्रदेश) असे त्यांनी सांगितल्यावरून त्यास अजून बारकाईने विचारपूस केली असता त्याने त्याचा भाऊ अंकित देवचरण लकीरा याचा मोबाईल क्रमांक दिला सदर मोबाईल क्रमांकावर कॉल करून विचारपूस केली असता मयंक हा मागील काही दिवसापासून घर सोडून आलेला आहे अशी माहिती मिळाली व तशी मिसिंग कंप्लेंट रजिस्टर करण्यात आलेली आहे. असे त्याचे परिवारातील लोकांनी सांगितले. मिसिंग मुलगा नामे मयंक याचे परिवारातील लोकांना पोलीस स्टेशन जलालखेडा येथे बोलून सुखरूप त्यांचे नातेवाईकाचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन जलालखेडा येथील ठाणेदार चेतनसिंग चौहान, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक जोशी, संजय रिधोरकर, आशिष हिरुडकर, किशोर कांडेलकर यांचे पथकाने केली.



# जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

**पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत मौजा उमरी गावाचे ब्रिज जवळ दिनांक ०५/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथील पोलीस पथक पोलीस स्टेशन केळवद हद्दीत नाकाबंदी करीत असताना मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन केळवद पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन मौजा उमरी गावाचे ब्रिज जवळ नाकाबंदी करुन आयसर क्र. एम.एच–४०/सी.टी–०११५ चा **चालक आरोपी नामे– अकबर मामुर खान, वय ३४ वष, रा. खेडी पोस्ट तलेनी तह. सारंगपुर जि. राजगड (एम.पी)** याने आपल्या ताब्यातील वाहनात ४० नग जिवंत बैल गौवंश व ३ नग मृत बैल गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्यदयतेने वाहनात डांबुन त्यांना आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून सदर आयसर क्र एम. एच– ४०/सी. टी–०११५ किंमती १०,००,०००/– रु. मध्ये ४० नग जिवंत बैल गौवंश किंमती ६,००,०००/– रु व ३ नग मृत बैल गौवंश किंमती ००/– रु. असे एकूण ४३ जनावरे कत्तली करिता घेऊन जात असता मिळून आले आहेत. ट्रक चालक यास ताब्यात घेऊन त्यांचेवर कारवाई करुन जनावरे चारपाणी रहाण्याची सोय करिता गौशाला येथे जमा करण्यात आले.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर